(1)

**महाराष्ट्र शासन**

आ 292
5/5/17
Inward No. आ 12
Date 5/5/17
Dy. CE/PPD/MB

क्र.विविचा-२००७/प्र.क्र.५१ (भाग-१)/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०४ मे,२०१७.

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
तथा सदस्य सचिव,
शक्ती प्रदत्त समिती - बीडीडी चाळी पुनर्विकास,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.२३.०३.२०१७ रोजी झालेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र. मुंमं/उमुअ/प्रनिस/न.क्र.बीडीडी-०७/६१८/१७, दि.३१.०३.२०१७.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या आपल्या संदर्भाधिन पत्रान्वये मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींच्या पुनर्विकासासाठी गठित शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२३.०३.२०१७ रोजी झालेल्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती, बी.डी.डी. चाळी पुनर्विकास यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. सदर इतिवृत्तास मान्यता देण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

Kulkarni

Dy CE (PPD)
Arch/M.B.
EE/PPD
5/5
4/5/17

आपला,

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.२३/०३/२०१७ रोजी झालेल्या " शक्ती प्रदत्त समिती"च्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यांत आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची सातवी बैठक दि.२३/०३/२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.एस. के. श्रीवास्तव | - मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग |
| २. | श्री.संजय कुमार | - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग |
| ३. | श्री. मनुकुमार श्रीवास्तव | - मा. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग |
| ४. | श्री. एन. जे. जमादार | - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग |
| ५. | श्रीमती वंदना कृष्णा | - मा. प्रधान सचिव, वित्त विभाग |
| ६. | श्री.एस.एस.झेंडे | - मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ म्हाडा तथा सदस्य सचिव |
| ७. | श्री. चं. दे. चोरे | - मा. उपायुक्त (सुधार) बृहन्मुंबई महानगरपालिका (मा.आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी) |
| ८. | श्री. श्रीरंग लांडगे | - मा.सह सचिव नगरविकास विभाग (मा. प्रधान सचिव नगर विकास-१ यांचे प्रतिनिधी) |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्द्यांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. तसेच मा. अध्यक्षाच्या परवानगीने सदस्य सचिव शक्ति प्रदत्त समिती तथा उपाध्यक्ष / म्हाडा यांनी कार्यसूचीतील मुद्दयांच्या अनुषंगाने चर्चा करण्यापूर्वी नायगावं व ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत आतापर्यंत करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबत सादरीकरण केले व त्यानंतर कार्यसूचीतील मुद्दयांच्या अनुषंगाने वरळी येथील वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागार श्री. विवेक भोळे ॲन्ड असोसिएटस यांनी वरळी येथील पुनर्विकास प्रकल्पाबाबतचे सादरीकरण केले. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचा झालेला निर्णय |
|---|---|---|
| १ | शक्तिप्रदत्त समितीच्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | शक्तिप्रदत्त समितीच्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करण्यास सर्वानूमते मान्यता देण्यात आली. |
| २ | दि.३०/०३/२०१६रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने, नायगांव व ना.म. जोशी मार्ग-लोअरपरेल येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या न्यूनतम निविदेस मान्यता देणेबाबत. | नायगांव व ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी दिनांक २८/१२/२०१६ रोजी जागतिक निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदेस केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तरतुदीनुसार ४५ दिवसांची मुदत देण्यात आलेली होती. संभाव्य निविदाकारांनी दि.१२/०१/२०१७ रोजी झालेल्या निविदापूर्व बैठकीत विनंती केल्यानुसार निविदा मुदत प्रथमतः १५ दिवसांनी वाढविण्यात आली. त्यानंतर सदर मुदतीत पुरेसा प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अनुक्रमे दोन वेळा सात दिवसांची निविदा मुदत वाढविण्यात आली व ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.२३/०९/१३ |

९२३७

(2)

विषय - म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग [ बीडीडी ] चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि.२३/०३/२०१७ रोजी झालेल्या " शक्ती प्रदत्त समिती"च्या सातव्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत.

बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाच्या संदर्भात गठित करण्यांत आलेल्या शक्ति प्रदत्त समितीची सातवी बैठक दि.२३/०३/२०१७ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे बैठक कक्षात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.एस. के. श्रीवास्तव | - मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग |
| २. | श्री.संजय कुमार | - मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग |
| ३. | श्री. मनुकुमार श्रीवास्तव | - मा. प्रधान सचिव, महसुल व वन विभाग |
| ४. | श्री. एन. जे. जमादार | - मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग |
| ५. | श्रीमती वंदना कृष्णा | - मा. प्रधान सचिव, वित्त विभाग |
| ६. | श्री.एस.एस.झेंडे | - मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ म्हाडा तथा सदस्य सचिव |
| ७. | श्री. चं. दे. चोरे | - मा. उपायुक्त (सुधार) बृहन्मुंबई महानगरपालिका (मा.आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी) |
| ८. | श्री. श्रीरंग लांडगे | - मा.सह सचिव नगरविकास विभाग (मा. प्रधान सचिव नगर विकास-१ यांचे प्रतिनिधी) |

सदर बैठकीत चर्चा करावयाच्या मुद्दयांची कार्यसूची सन्माननीय सदस्यांना सादर करण्यात आली होती. तसेच मा. अध्यक्षाच्या परवानगीने सदस्य सचिव शक्ति प्रदत्त समिती तथा उपाध्यक्ष / म्हाडा यांनी कार्यसूचीतील मुद्दयांच्या अनुषंगाने चर्चा करण्यापूर्वी नायगावं व ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत आतापर्यंत करण्यांत आलेल्या कार्यवाहीबाबत सादरीकरण केले व त्यानंतर कार्यसूचीतील मुद्दयांच्या अनुषंगाने वरळी येथील वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागार श्री. विवेक भोळे ॲन्ड असोसिएटस यांनी वरळी येथील पुनर्विकास प्रकल्पाबाबतचे सादरीकरण केले. कार्यसूचीत नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा होऊन पुढील निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | झालेली चर्चा व समितीचा झालेला निर्णय |
|---|---|---|
| १ | शक्तिप्रदत्त समितीच्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करणे. | शक्तिप्रदत्त समितीच्या सहाव्या बैठकीचे इतिवृत्त स्थायी करण्यास सर्वानूमते मान्यता देण्यात आली. |
| २ | दि.३०/०३/२०१६रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने, नायगांव व ना.म. जोशी मार्ग-लोअरपरेल येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या न्यूनतम निविदेस मान्यता देणेबाबत. | नायगांव व ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी दिनांक २८/१२/२०१६ रोजी जागतिक निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदेस केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तरतुदीनुसार ४५ दिवसांची मुदत देण्यात आलेली होती. संभाव्य निविदाकारांनी दि.१२/०१/२०१७ रोजी झालेल्या निविदापूर्व बैठकीत विनंती केल्यानुसार निविदा मुदत प्रथमतः १५ दिवसांनी वाढविण्यात आली. त्यानंतर सदर मुदतीत पुरेसा प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अनुक्रमे दोन वेळा सात दिवसांची निविदा मुदत वाढविण्यात आली व ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.२३/०९/१३ |

रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तरतुदीनुसार दिनांक १७/०३/२०१७ रोजी तांत्रिक निविदा व दिनांक १८/०३/२०१७ रोजी आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. या प्रक्रियेबाबतचे विश्लेषण सदस्य सचिव तथा उपाध्यक्ष / म्हाडा यांनी केले व नायगांव येथील प्रकल्पासाठी मे. एल. ॲन्ड टी. यांचा न्यूनतम दर रु. ४३,४४४/- प्रति चौ.मी तर ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील प्रकल्पासाठी शापूरजी ॲन्ड पालनजी यांच्या निविदेतील न्यूनतम दर रु. ४७,२७९/- प्रति चौ.मी. प्राप्त झाल्याचे सदस्य सचिव तथा उपाध्यक्ष / म्हाडा यांनी नमूद केले. निविदेत नमूद Item Specifications, Scope of work of contractor, इ. बाबत कार्यकारी अभियंता / प्रनिस विभाग/ मुं.मं. यांनी पुढीलप्रमाणे ठळक मुद्यांचा तपशील समिती सदस्यांसमोर सादर केला.

The Contractor shall complete all the scope as mentioned below at his cost for the consideration that has been quoted under Price Bid:

1) Construction of units and commercial area including buildable reservations under rehabilitation and sale component/ commercial as per the drawings and the master plan provided and will include Rehabilitation and Sale Buildings, Amenity, Designations, Commercial Buildings, Religious Structures and execution of all onsite and off-site infrastructural works, after obtaining necessary approvals from concerned Authorities and completion of project works within scheduled time frame.
2) Conduct necessary investigations and survey for designing of the construction.
3) Shifting of necessary infrastructure, including reconnection as per site conditions/MCGM and other necessary approvals in such a way that existing infrastructure and services to other existing buildings / chawls is not affected / remains functional.
4) Demolition of vacant existing structures after transportation and disposal/sale of such waste generated as per environmental norms and safety of the adjoining structures.
5) To maintain field laboratory for carrying out testing of construction materials.
6) Repair any defect in constructed buildings including allied spaces for a period of five years (Defects Notification Period) starting from the date of such completion of each cluster;
7) To maintain the quality of rehab, sale amenity and commercial and other construction work in all respects by using Standard quality material as stipulated in Technical Specifications.
8) Transportation of existing occupants along with their belongings, as per the project implementation plan, to transit accommodation as finalized by MHADA.
9) Relocation of existing and eligible religious Structures, eligible religious Structures, eligible hutments/

| | | |
|---|---|---|
| | | unauthorized structures/stalls / Samaj Mandir etc.<br>10) To transport and shift beneficiaries from transit camps to constructed units after obtaining Occupation Certificate and after construction of allied infrastructure requirements for such phased completion.<br>11) To maintain (O&M) during the respective O&M Period as defined, all the buildings (attending towards cracks/leakage/discolouration of paint) and infrastructure created in respect of water supply, lift, electrical pumps, Fire Fighting System, Sewerage Treatment Plant (STP), Solar system, Rainwater harvesting system, Layout Street Light, including any common infrastructure and services etc.<br>However other details are as per tender document.<br>नायगांव व ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल या दोन्ही ठिकाणच्या कामाकरीता प्राप्त दर अंदाजित बांधकाम किंमतीपेक्षा अनुक्रमे ३.६ % व १.३% जास्त आले असून संबंधित वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागार व प्रकल्प समंत्रक यांनी प्राप्त दर वाजवी असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्याचे उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ म्हाडा यांनी सांगितले. त्यानंतर दोन्ही प्रकल्पात न्यूनतम निविदाकारांकडून प्राप्त झालेला देकार हा वाजवी असल्याने ना.म.जोशी मार्ग, लोअरपरेल व नायगांव येथील न्यूनतम निविदा स्विकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला. |
| ३ | दिनांक ३०/०३/२०१६ च्या शासन निर्णयास अनुसरुन वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाबाबत वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे यांनी तयार केलेल्या मास्टर प्लानची छाननी करुन मास्टर प्लान अंतिम करणेबाबत. | उपाध्यक्ष म्हाडा तथा सदस्य सचिव शक्ती प्रदत्त समिती यांनी मा. समिती सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले की, नायगांव व ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल येथील प्रकल्पाच्या मास्टर प्लानला म्हणजेच (Schematic Plan) ला शक्ती प्रदत्त समितीच्या दि. १६/०९/२०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. याच धर्तीवर वरळी नाका येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टर प्लान म्हणजेच Schematic Plan वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे यांनी तयार केला आहे. त्यास मान्यता देण्याबाबत मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे यांच्या वतीने मा. समिती सदस्यांसमक्ष सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणाअंती वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या मास्टर प्लानला म्हणजेच Schematic Plan ला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| ४ | नायगांव, ना.म. जोशी मार्ग-लोअर परेल व वरळी या तिनही ठिकाणच्या बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांना दयावयाच्या व्यावसायिक शुल्कास मान्यता देणे बाबत. | या प्रकरणी मुख्य अधिकारी/मुं.मं. यांनी समितीसमोर सादर केले की, नायगांव व ना.म. जोशी मार्ग येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांना वास्तुशास्त्रीय सेवा (Architectural Consultancy) देण्याबाबत प्रकल्प बांधकाम किंमतीच्या ०.७५ % व प्रकल्प समंत्रकाच्या कामाकरीता (PMC) प्रकल्प बांधकाम किंमतीच्या १.०० % असे व्यावसायीक शुल्क देण्याचे प्रस्तावित आहे.<br>या प्रकल्पासाठी अवलंबिलेल्या वास्तुशास्त्रज्ञाच्या निवड पद्धतीबाबत व त्यांच्या Scope of Work बाबत मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार म्हाडा यांनी मा. समिती सदस्यांसमोर माहिती सादर केली. सदरील प्रस्तावाबाबत मा. मुख्य सचिव यांनी विचारणा केली की, प्रकल्प समंत्रक |

(पीएमसी) या कामाबाबतचा उल्लेख मुळ आर.एफ. पी. मध्ये करण्यात आला होता का ? यावर मुख्य अधिकारी / मुं.मं. यांनी स्पष्ट केले की, स्पर्धात्मक नियोजन मार्गदर्शक पुस्तिकेत (Guidelines for Design Competition Booklet) वास्तुशास्त्रीय सेवा टप्पा-१ ते ४ करीता नमूद होती. तथापी, नियोजनपूर्व बैठकीत (Pre-Bid Meeting) टप्पा क्र.५ समाविष्ट होण्याची शक्यता वर्तविली होती. दरम्यान प्रकल्पाची एकंदर व्याप्ती पाहता टप्पा क्र. ५ च्या कामकाजाबाबत देखरेखीकरीता वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांची नेमणूक करणे आवश्यक ठरले तसेच प्रकल्प समंत्रक (PMC) कामकाजासाठी स्वतंत्र निविदा मागविल्यास या प्रकल्पासाठी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार व प्रकल्प समंत्रक या दोन्ही सेवांकरीता एकत्रीत फी म्हणजे EOI नुसार २ % व अपेक्षित निविदा देकार किमान १ % असे एकूण शुल्क ३ % असे आले असते.प्राधिकरणाच्या ठराव क्र.५३१५ दि. १५/०६/१९९८ मध्ये वास्तुशास्त्रीय सेवेकरीता दैनंदिन देखरेख गृहित धरुन नमूद केलेले व्यावसायिक शुल्क हे २.५०% असून, संबंधित वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागारांसोबत चार वेळा घेण्यात आलेल्या संयुक्त बैठकीत वाटाघाटी (Negotiations) द्वारे सदर शुल्क कमी करण्यात येवून त्यामध्ये वास्तुशास्त्रज्ञ सल्लागाराच्या सेवेसोबतचा व प्रकल्प समंत्रकांच्या सेवेचा समावेश करुन याकरीता अनुक्रमे ०.७५% व १.००% इतके शुल्क मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्तरावर वाटाघाटीअंती निश्चित करण्यात आले म्हाडाने सद्यस्थितीत निश्चित केलेले एकत्रीत शुल्क १.७५% हे निश्चितच म्हाडास आर्थिकदृष्टया फायदेशीर आहे व सदरील दर वाजवी आहेत.

तसेच मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार यांनी समितीसमोर सादर केले की, नियमित वास्तुशास्त्रीय सेवे व्यतिरिक्त नियुक्त वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागारास त्यांच्या स्तरावर विविध सल्लागार नियुक्त करुन त्या सेवेकरीता त्यांच्या व्यावसायिक शुल्कामधून रक्कम अदा करावी लागते. जसे की, (१) Structural Consultant, (२) MEP, (३) Landscape (४) Lighting (५) Faccade (६) Building & Management Service (७) Vertical Transport (८) Fire Fighting (९) Geological Survey (१०) Parking (११) STP इ. सेवा.

तसेच सदर वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारामार्फत आवश्यक अभियांत्रिकी, प्रकल्प व्यवस्थापन, वाणिज्य इ. क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी कर्मचारीवृंदाची स्वतंत्रपणे नेमणूक प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी करणे अपेक्षित आहे. साधारण २५ ते ३० इतका स्वतंत्र कर्मचारीवृंद नेमला जाईल. असे वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. संदिप शिक्रे यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

या प्रकारच्या महत्वाकांक्षी प्रकल्पात विविध कामांमध्ये सुसुत्रीकरण असणे आवश्यक आहे, या दृष्टीकोनातून वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार व प्रकल्प समंत्रक एकच असणे योग्य होईल व जेणे करुन मतभिन्नता टाळता येईल. तसेच वास्तुशास्त्रीय सेवा व प्रकल्प समंत्रक सेवा एकाच एजन्सीकडे सोपविण्यात आल्याने पुनर्विकास प्रकल्प राबविणे तांत्रिकदृष्टया सोपे होईल. या कारणास्तव वास्तुशास्त्रज्ञ-सल्लागार सेवा व्यतिरिक्त प्रकल्प समंत्रक सेवा या दोन्ही सेवांकरीता एकाच

| | | |
|---|---|---|
| | | वास्तुशास्त्रज्ञ सल्लागाराकडे जबाबदाऱ्या सोपवण्याचे वाटाघाटी अंती ठरविण्यात आले असे समिती सदस्यांसमोर उपाध्यक्ष तथा मु.का.अ./म्हाडा यांनी सादर केले.<br>यावर मुख्य सचिव यांनी, पीएमसी सेवा देणेबाबतची स्वयंस्पष्ट कारणमिमांसेची नोंद ठेवण्यात यावी असे सूचित केले व या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| ५ | मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय सादर करणे. | ............ |

या चर्चेनंतर मा. अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

उपाध्यक्ष तथा मु.का.अ. / म्हाडा
तथा सदस्य सचिव / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग
तथा सदस्य / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
तथा अध्यक्ष / शक्ती प्रदत्त समिती
बीडीडी चाळी पुनर्विकास